**नियमित फौजदारी खटला क्रं.९७५/२०१६.**
**निशाणी नं.३४**

**CNR No.MHPU060046902016**
**साक्षीदार क्रं.१.**

**सरतपास शपथेवर सुरु.**

नाव : राहुल फत्तेसिंह पाटील,
वय ४९ वर्षे, धंदा : नोकरी,
राहणार : पाषाण, सुसरोड, पुणे.

**सरतपास सरकारतर्फे सरकारी वकील श्री. डी. जी. काळे.**

१. आरोपीची वेरासिटी लँडमार्क नावाची कंपनी आहे. त्याने सन २०१२ मध्ये एमरॉल्ड व्हॅली, बेडगाव, ता. मानगाव, जि. रायगड, येथे प्रोजेक्ट सुरु केला होता. मी तेथे ३ गुंठ्याचा प्लॉट घेतला होता. त्यासाठी मी फेब्रुवारी २०१२ मध्ये टोकन रक्कम एक लाख रुपये दिली. मार्च २०१२ मध्ये आम्ही एम.ओ.यु. केला. त्यानंतर दिड वर्षात आरोपीने एन.ए. करुन डेव्हलपमेंट करुन प्लॉटचा ताबा देऊन खरेदी पत्र करण्याचे ठरले होते. तेव्हापासुन मी दरमहा पाच हजार रुपये चेकने मी इन्स्टॉलमेंट देत होतो. सप्टेंबर २०१७ पर्यंत आरोपीस मी २,६६,३१२/– रुपये दिले. परंतु आरोपीने डेव्हलपमेंट केली नाही व मिळकत एन.ए. ही केली नाही. आरोपीने एक दिड वर्ष कायदेशीर अडथळे आहेत, असे सांगुन टाळाटाळ केली.

२. आरोपी कराराची पुर्तता करत नसल्यामुळे मी त्यास करार रद्द करण्यासाठी अर्ज केला. आरोपीने माझा अर्ज स्वीकारुन मी दिलेली रक्कम परत करण्यासाठी मला २,६६,३१२/– रुपयाचा धनादेश दिला. तो मी बँकेत भरला असता तो आरोपीच्या खात्यावर पुरेशी रक्कम नसल्याने अनादरित झाला. मी आरोपीकडे रक्कम परत देण्यासाठी दोन महिने चकरा मारत होतो. दोन महिन्यांनी आरोपीने मला ५०,०००/– रुपये परत दिले. उरलेली रक्कम एक महिन्यात देतो असे आश्वासन दिले. परंतु आरोपीने रक्कम दिली नाही. त्यामुळे मी आरोपीला वकीलांमार्फत नोटीस पाठविली. नोटीस पाठवुनही रक्कम दिली नाही म्हणून मी प्रस्तुत फिर्याद दाखल केली.

३. मी एम.ओ.यु., हप्ते भरल्याच्या मुळ पावत्या व माझे पासबुकची मुळ प्रत दाखल

केली आहे. तसेच आरोपीने दिलेले करार रद्दचे पत्र, मुळ धनादेश व बँक मेमो दाखल केला आहे. मला आता मुळ एम.ओ.यु. दाखविला त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी, आरोपीची व साक्षीदाराची सही आहे. त्यास **निशाणी–३५** दिली. मला आता एकुण ३१ पावत्या दाखवल्या त्या आरोपी कंपनीने दिल्या असुन त्यावर आरोपी कंपनीचे सिल व सही आहे. त्यास **निशाणी – ३६ ते ६६** दिली. मी माझे पासबुक दाखविले. त्यास **निशाणी –६७,** दिली. करार रद्द केल्याबाबतचे पत्र दाखवले. त्यावर आरोपी कंपनीचा सही व शिक्का असुन त्यास **निशाणी – ६८** दिली. आता मला धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी – ६९**, बॅक मेमो दाखविला तो तोच आहे. त्यास **निशाणी – ७०** दिली.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एच.एच. आठवळे –**

४. उलटतपास राखुन ठेवला

श्रवणोत्तर स्वीकृत

**Sd/-XXX**

दिनांक : १४/१०/२०२२.

(डी. जे. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.